प्रेसनोट ३०/०८/२०१८

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, पनवेल जि. रायगड येथील उप विभागीय अधिकाऱ्यास लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा**

दिनांक ०१/०९/२००९ रोजी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, पनवेल, जि.रायगड.येथील उप विभागीय अधिकारी, **प्रमोद रणजितसिंग भैसे**, यांना यातील तकारदार यांच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या वाढीव निधीच्या रकमेचा धनादेश देण्यासाठी तकारदार यांच्याकडुन ४०,०००/– रुपये लाच स्विकारताना रंगेहाथ पकडुन, त्यांच्याविरुध्द् वाशी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. विशेष न्यायालय, ठाणे, येथे नमुद आरोपी यांचेविरुध्द् दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.

सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष न्यायाधीश, ठाणे कोर्ट येथे झाली असता सुनावणीअंती नमुद आरोपीविरुध्द् सबळ पुराव्यानिशी आरोप सिध्द् झाल्याने दिनांक २८/०८/२०१८ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

**शिक्षा** – भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे १ वर्षे सक्त मजुरी व १००० रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधी कैद.

कलम १३(१) (ड) सह १३(२) प्रमाणे १ वर्षे सक्त मजुरी व १००० रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधी कैद.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री.सुर्यकांत कराळे, अेसीबी, नवी मुंबई यांनी केला असुन सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता म्हणून श्रीमती मोहोळकर यांनी काम पाहिले.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979/02141-222331**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner

प्रेसनोट ३०/०८/२०१८

## खाजगी इसमास(एजंट) लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा

दिनांक ०४/१२/२०१३ रोजी, खाजगी इसम, एजंट, रा.कळवा, ठाणे, **शेखर बाळु जगताप**, यांना यातील तकारदार यांचे प्रॉपटी टॅक्स आईच्या नावे करण्यासाठी यातील तकारदार यांच्याकडुन ६,०००/– रुपये लाच स्विकारताना रंगेहाथ पकडुन, त्यांच्याविरुध्द रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. विशेष न्यायालय, ठाणे, येथे नमुद आरोपी यांचेविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.

सदर खटल्याची सुनावणी मा. विशेष न्यायाधीश, ठाणे कोर्ट येथे झाली असता सुनावणीअंती नमुद आरोपीविरुध्द् सबळ पुराव्यानिशी आरोप सिद्‌ध झाल्याने दिनांक २९/०८/२०१८ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

**शिक्षा** – भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ८ प्रमाणे ६ महिने सक्त मजुरी व १००० रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधी कैद.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, श्रीमती ममता डिसोजा, असीबी, ठाणे यांनी केला असुन, सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता म्हणुन श्रीमती हिवराळे व श्री. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979/02141-222331**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner